# विक्रीकर निरीक्षक, गट - ब (अराजपत्रित) मुख्य परीक्षा

## -: परीक्षा योजना :-

**प्रश्नपत्रिकेचे स्वरुप -** वस्तुनिष्ठ बहुपर्यायी **एकूण गुण -** 200

**प्रश्नपत्रिकांची संख्या - दोन. प्रत्येक प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे**

| पेपर क्र. व संकेतांक | विषय | गुण | प्रश्नसंख्या | दर्जा | माध्यम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 (संकेतांक 002) | मराठी व | 60 | 60 | मराठी - बारावी | मराठी | एक तास |
| | इंग्रजी | 40 | 40 | इंग्रजी - पदवी | इंग्रजी | |
| 2 (संकेतांक 025) | सामान्य ज्ञान, बुध्दिमापन व विषयाचे ज्ञान | 100 | 100 | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास |

## अभ्यासक्रम

**पेपर क्रमांक - 1 मराठी व इंग्रजी**

**मराठी :-** सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाक्प्रचार यांचा अर्थ आणि उपयोग तसेच उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे

**इंग्रजी : -** Common Vocabulary, Sentence structure, Grammar, use of Idioms and phrases & their meaning and comprehension of passage.

**पेपर क्रमांक - 2**

सामान्य ज्ञान, बुध्दिमापन व विषयाचे ज्ञान :- या विषयामध्ये खालील घटक/ उपघटकांचा समावेश असेल.

1 **चालु घडामोडी - जागतिक तसेच भारतातील**

2 **बुध्दिमत्ता चाचणी**

3 **महाराष्ट्राचा भूगोल** - महाराष्ट्राचा रचनात्मक (Physical) भूगोल, मुख्य रचनात्मक (Physiographic) विभाग, Climate, पर्जन्यमान व तापमान, पर्जन्यातील विभागवार बदल, नद्या, पर्वत व डोंगर, राजकीय विभाग, प्रशासकीय विभाग, नैसर्गिक संपत्ती- वने व खनिजे, मानवी व सामाजिक भूगोल- लोकसंख्या (Population), Migration of Population व त्याचे Source आणि Destination वरील परिणाम, ग्रामीण वस्त्या व तांडे, झोपडपट्टया व त्यांचे प्रश्न.

4 **महाराष्ट्राचा इतिहास** - सामाजिक व आर्थिक जागृती (१८८५-१९४७), महत्वाच्या व्यक्तींचे काम स्वातंत्र्यपूर्व भारतातील सामाजिक जागृतीतील वर्तमानपत्रे व शिक्षणाचा परिणाम / भाग, स्वातंत्र्यपूर्व काळातील इतर समकालीन चळवळी, राष्ट्रीय चळवळी.

5 **भारतीय राज्यघटना -** घटना कशी तयार झाली आणि घटनेच्या प्रस्तावनेमागची भूमिका व तत्वे, घटनेची महत्वाची कलमे / ठळक वैशिष्टये, केंद्र व राज्य संबंध, निधर्मी राज्य, मूलभूत हक्क व कर्तव्ये, राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे-शिक्षण, युनीफॉर्म सिव्हील कोड, स्वतंत्र न्यायपालिका, राज्यपाल, मुख्यमंत्री व मंत्रीमंडळ-Role, अधिकार व कार्य, राज्य विधीमंडळ- विधानसभा, विधानपरिषद व त्यांचे सदस्य, अधिकार, कार्य व Role, विधी समित्या.

6 **माहिती अधिकार अधिनियम -** 2005

7 **संगणक व माहिती तंत्रज्ञान -** आधुनिक समाजातील संगणकाची भूमिका, वेगवेगळया क्षेत्रातील जीवनात संगणकाचा वापर, डाटा कम्युनिकेशन, नेटवर्कींग आणि वेब टेक्नॉलोजी, सायबर गुन्हे व त्यावरील प्रतिबंध, नविन उद्योग म्हणून माहिती तंत्रज्ञानाचा निरनिराळया सेवा सुविधांची माहिती मिळण्यासाठी होणारा उपयोग, भारतातील माहिती तंत्रज्ञान उद्योगाची वाढ व त्याचा दर्जा, शासनाचे कार्यक्रम, जसे मिडीया लॅब एशिया, विद्या वाहिनी, ज्ञान वाहिनी, सामुहिक माहिती केंद्र इत्यादी, माहिती तंत्रज्ञान उद्योगातील मुलभूत प्रश्न, त्यांचे भवितव्य. VAT व GST व त्यात संगणकीकरणाचे फायदे.

8 **नियोजन** - प्रक्रिया, प्रकार, भारताच्या पहिल्या ते दहाव्या पंचवार्षिक योजनेचा आढावा, मुल्यांकन, सामाजिक व आर्थिक विकासाचे निर्देशफलक, राज्य आणि स्थानिक पातळीवरील नियोजन, विकेंद्रीकरण, ७३ व ७४ वी घटना दुरुस्ती , भारतीय अर्थव्यवस्था, क्षेत्रीय विकासाचा कल व सेवा क्षेत्राची रुपरेषा, भारतीय अर्थव्यवस्थेच्या समोरील आव्हाने, गरीबी, बेरोजगारी आणि प्रादेशिक असमतोल.

9 **शहरी व ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचा विकास -** पायाभूत सुविधांची गरज व आणि महत्व, सामाजिक व आर्थिक पायाभूत सुविधांचा विकास आणि वाढ - जसे उर्जा, पाणीपुरवठा व मलनि:सारण, गृह, परिवहन (रस्ते, बंदर, इत्यादी) दळणवळण (पोस्ट व तार, दूरसंचार) रेडीओ, टि.व्ही. इंटरनेट क्रायसिस, भारतातील इन्फ्रास्ट्रक्चरचे प्रश्न व या संबंधीचे धोरण व त्यावरील पर्याय; खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील भागीदारी, एफ.डी. आय. आणि इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट, इन्फ्रास्ट्रक्चर विकासाचे खाजगीकरण, राज्य व केंद्र सरकारचे इन्फ्रास्ट्रक्चर विकासाचे धोरण, ग्रामीण व शहरी भागातील परिवहन व गृह या विषयीचे प्रश्न व त्यावरील केंद्र व राज्य सरकारचे कार्यक्रम व उपक्रमशिलता.

10 **आर्थिक सुधारणा व कायदे -** पार्श्वभूमी, उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरण संकल्पना व त्याचा अर्थ आणि व्याप्ती, मर्यादा, केंद्र व राज्य स्तरावरील आर्थिक सुधारणा, WTO, तरतुदी आणि सुधारणा आणि त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील अपेक्षित परिणाम, प्रश्न व समस्या, GST. विक्रीकर, VAT, WTO, इत्यादी शी संबंधीत कायदे/नियम.

11 **आंतरराष्ट्रीय व्यापार व आंतरराष्ट्रीय भांडवल चळवळ -** जागतिकीकरणाच्या युगातील सूत्र व कल, वाढ, रचना आणि भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराची दिशा, भारतीय आंतरराष्ट्रीय व्यापाराचे धोरण, निर्यातीतील वाढ, WTO आणि आंतरराष्ट्रीय व्यापार विदेशी भांडवलाचा अंतप्रवाह, रचना व वाढ, FDI व्यापार, बहुआंतरराष्ट्रीय भांडवल पुरविणा-या संस्था, IMF जागतिक बँक, IDA इंटरनॅशनल क्रेडीट रेटींग.

12 **सार्वजनिक वित्त व्यवस्था -** महसुलाचे साधन, टॅक्स , नॉनटॅक्स, भारतातील केंद्र व राज्यातील सार्वजनिक ऋण, केंद्र व राज्याची सार्वजनिक खर्च वाढ, सार्वजनिक खर्च सुधारणा कामावर आधारित अर्थसंकल्प, शुन्याधारित अर्थसंकल्प, भारतातील करसुधारणा आढावा, राज्य पातळीवरील करसुधारणा VAT सार्वजनिक ऋण वाढ, रचना आणि भार, राज्याची कर्जबाजारीपणाची केंद्राला समस्या, राजकोषीय तुट, संकल्पना, तुटीचे नियंत्रण, केंद्र, राज्य व रिझर्व्ह बँकेचे उपक्रम, भारतातील राजकोषीय सुधारणा, केंद्र व राज्यस्तरावरील आढावा.